PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 5, ISSUE 6

# गांधी : एक असामान्य नेतृत्व

**अरुण एस. वाहूळ**
सहाय्यक प्राध्यापक
विवेकानंद महाविद्यालय, औरंगाबाद
**(महाराष्ट्र) भारत**

जागतिक इतिहासाकडे एक दृष्टीक्षेप टाकल्यास आपणास जाणवते की जगामध्ये ज्या नेत्यांनी देशातील स्वातंत्र्य संग्रामात, युध्दात महत्वाची भूमिका बजावली होती त्यांनी स्वातंत्र्यानंतर सत्तेपासून दूर न जाता देशाची सत्ता स्वतःच्या हातामध्ये ठेवली. देशाचे सर्वोच्च पद स्वतःकडे घेऊन देशाला नेतृत्व दिले. जॉर्ज वॉशिंगटन पासून ते नेल्सन मंडेला पर्यंत असेच चित्र पाहण्यास मिळते. पण गांधी या गोष्टीला अपवाद होते. त्यांनी देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले पण ते सत्तेत सहभागी झाले नाही. त्यांनी सत्तेच्या राजकारणाचा भाग न होता. देशाचे मुलभूत प्रश्न सोडविण्यासाठी प्रत्यक्ष लोकांमध्ये जाऊन काम करण्यास सुरुवात केली. गांधींच्या राजकीय नेतृत्वाचा तो एक वेगळा गुण होता, जो त्यांच्या कार्याकडे पाहिल्यानंतर दिसतो.

गांधींवर आतापर्यंत पाच हजाराच्या वर पुस्तके लिहिली गेली आहे. भारत सरकारने ही त्यांचे समग्र साहित्य प्रकाशित केले आहे. या सर्व लिखाणामध्ये गांधीच्या राजकीय नेतृत्वाची चर्चा अल्प प्रमाणात केलेली आहे किंवा विखूरलेल्या पध्दतीने मांडण्यात आली आहे. या लेखाच्या माध्यमातून गांधींच्या अगोदर भारतीय नेतृत्व कसे होते? गांधींनी भारतीयांना स्वातंत्र्य चळवळी दरम्यान एक सक्षम नेतृत्व कशा पध्दतीने दिले? गांधींच्या आगमनानंतर भारतीय राजकारणात कोणते बदल झाले? गांधींचा भारतीय राजकारणाकडे आकृष्ट करण्यासाठी कोणत्या मार्गाचा अवलंब केला? त्याचा भारतीय राजकारणावर काय परिणाम झाला? राजेशाहीची परंपरा असलेल्या लोकांना लोकशाहीची मूल्य त्यांनी कशा पध्दतीने रुजविली? भारतीय राजकारणात त्यांनी कोणती मूल्य रुजविली याचा मागोवा घेण्यासाठी प्रस्तुत विषयाची निवड करण्यात आलीण्

**गांधींच्या अगोदरचे नेतृत्व:**

गांधी जानेवारी 1915 ला दक्षिण आफ्रिकेतील काम संपवून भारतात आले. गांधी भारताच्या राजकारणात सक्रिय होण्याच्या अगोदर राष्ट्रीय चळवळ सुरु झालेली होती. त्या चळवळीला नेतृत्व होते. पण त्या नेतृत्वाच्या निश्चित अशा मर्यादा होत्या. दादाभाई नौरोजी, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, गोखले, टिळक यांनी काँग्रेसला पुढे घेऊन जाण्याचा प्रयत्न केला होता. पण त्यांना काँग्रेसला लोकाभिमूख करण्यामध्ये यश मिळाले नव्हते. ते आपल्या आपसातील वैचारिक संघर्षामध्ये गुरफटून राहिले.[1] त्यांनी काँग्रेसमधील लोकसहभागापेक्षा जहाल, मवाळ, राजकीय सुधारणा की समाज सुधारणा या चर्चेमध्ये जास्त वेळ वाया घातला. गांधीपूर्व काँग्रेसच्या नेतृत्वाने ब्रिटिश एकत्र येत होते व तेथेही आल्यानंतर आपण घेतलेल्या भूमिका वारंवार तपासून पाहत होते की आपण घेतलेली भूमिका ही ब्रिटिशांच्या विरुध्द तर नाही ना. गांधीपूर्व काँग्रेसमध्ये लो. टिळक फार जहालवादी नेते मानले जायचे पण लो. टिळकांवर जेव्हा देशद्रोहाचा खटला 1908 मध्ये दाखल केला. तेव्हा टिळक न्यायालयामध्ये हे पटवून देण्याचा प्रयत्न करत होते की माझे लिखाण हे ब्रिटिश सरकारच्या विरुध्द नाही, मी ब्रिटिश सरकार विरुध्द असे लिहुच शकत नाही.[2] टिळकांच्या याच भूमिकेसारखी काँग्रेसच्या इतर लोकांची भूमिका होती. त्यामुळे तरुण वर्गाला त्यांची ही पध्दत आवडली नाही व त्यांनी काँग्रेसच्या मार्गाचा स्वीकार न करता हिंसक मार्गाचा अवलंब केला. त्यामुळे गांधीपूर्व काँग्रेस नेतृत्वावर बहुसंख्य लोकांचा विश्वास नव्हता. याचे महत्वाचे कारण हेही होते की यामध्ये फक्त उच्च शिक्षित भारतीयांनाच प्रवेश होता. सुरुवातीची काँग्रेस व त्याचे नेते हे कामापेक्षा बोलण्यावर, राहणीमानावर जास्त लक्ष देत होते. ते स्वतःला भारतीय न समजता ब्रिटिश असल्याचे भासविण्याचा प्रयत्न करत होते.

**गांधींचे भारतात आगमन:**

दक्षिण आफ्रिकेतील आपले काम संपवून गांधी 1915 ला भारतात आले. गांधींच्या भारतातील आगमनानंतर प्रत्येक क्षेत्रात अमूलाग्र परिवर्तन झाले. हे गांधींनी दिलेल्या नेतृत्वामुळे शक्य झाले होते. गांधींच्या नेतृत्वामध्ये काही असामान्य गुण होते. ज्यामुळे लोक त्यांच्याकडे आकृष्ट झाले.

नेतृत्व या विषयाचे अमेरिकेतील गुरु जॉन मॅकस्वेल यांनी लोकांना ज्याचा मार्ग अनुसरवा असे वाटेल अशा नेत्यांमध्ये 21 गुण अत्यावश्यक आहेत असे म्हटले आहे.[3] या गुणांमध्ये चारित्र्य, करिश्मा, जबाबदारीची जाणीव, जनसंपर्क, क्षमता, धाडस, विवेकबुध्दी, एकाग्रता, औदार्य, पुढाकार, श्रोतृत्व, भावना प्रधानता, जबाबदारपणा, सुरक्षितता, स्वयंशिस्त, सेवावृत्ती, अध्यापन क्षमता व दूरदृष्टी.[4] यांचा समावेश केला होता.

इंग्लंडचे फिल्ड मार्शल बर्नार्ड मॉडगोमटी यांनी नेतृत्वाची छोटी व्याख्या केली होती. त्यांच्यामते एकाच हेतूने प्रेरित झालेल्या अनेक स्त्री-पुरुषांना एकत्र आणण्याची क्षमता व इच्छा आणि विश्वासार्ह

चारित्र्य म्हणजे नेतृत्व.[5] या दोन्ही विचारांचा विचार करता गांधी यामध्ये चपखल बसतात. गांधीमध्ये परिपक्व नेत्याचे सर्व गुण होते. ज्याच्याबळावर त्यांनी भारतीय राजकारणाला वेगळे वळण दिले. त्यांच्या त्या नेतृत्व गुणांमुळे स्वातंत्र्य चळवळीला गती मिळाली.

**गांधींचे राजकीय नेतृत्व:**

गांधीच्या आगमनानंतर भारतीय राजकारणाची समीकरणे बदलली. गांधीनी स्वतःच्या राजकीय गुणाच्या बळावर काँग्रेसचे नेतृत्व आपोआप स्वतःकडे वळविले. इतर कोणत्याही राजकीय नेत्यापेक्षा गांधीना जास्त चांगला भारत समजला होता. गांधीनी भारतीयांचा मानस ओळखून त्याच पध्दतीने नेतृत्व करण्याचा प्रयत्न केला. गांधीना माणसे ओळखण्याची निसर्गदत्त देणगी होती. गांधीनी काँग्रेसचे नेतृत्व स्वीकारल्यानंतर सर्वसामान्य भारतीयांच्या मनात काय आहे हे ओळखले. भारतीयांविषयी गांधी म्हणाले होते की, ‘‘हा समाज इतराहून मुळातच वेगळा होता. तो शांत आणि मंद असला तरी लोकसमुदायाच्या कौल हालातूनही तो स्पष्टपणे ऐकू येत असे. तो सौम्य आणि शालीन होता, (पण त्याचा आशय ध्यानात आल्यावर) त्यांच्यामध्ये कुठेतरी पोलाद दडवलेले आहे असा भास होई. तो विनम्र आणि आर्जवी होता. परंतु त्यांच्यामध्ये काहीतरी रौद्र व भयप्रद होते. त्यातील प्रत्येक शब्द अर्थपूर्ण होता आणि त्यामधुन पराकाष्ठेची तळमळ दिसून येत होती. शांतता आणि सौहार्द यांच्या भाषेमधुन एक प्रकारचे सामर्थ्य प्रगट होत होते. कृतीची चाहुल लागत होती आणि कोणत्याही अन्यायापुढे शरणागती न पत्करण्याचा निर्धार व्यक्त होत होता.’’[6]

भारतीय समाजाविषयी परदेशी विद्वानांनी वर्णन करतांना म्हटले होते की हा समाज अपरिवर्तनीय आहे. नवीन विचार स्वीकारत नाही.[7] गांधींनी भारतीयांची मानसिकता लक्षात घेऊन त्यांना स्वातंत्र्य चळवळीत आणण्याचा प्रयत्न केला. त्यांनी भारतीयांचा विचार करून आपल्या चळवळीची साधने निवडली. गांधीनी बहुसंख्यक लोकांना काँग्रेसमध्ये व स्वातंत्र्य चळवळीकडे आकृष्ट करण्यासाठी धार्मिक प्रतिकांचा वापर केला. त्यावरुन लोक गांधीवर टीका करु लागले की त्यांनी राजकारणात धर्म आणला? हे गोष्ट खरी आहे की गांधीनी राजकारणात धर्म आणला. पण तो त्यांचा दोष नव्हता तर तो त्यांच्या असामान्य नेतृत्वाचा एक गुण म्हणावा लागेल. भारतीयांचा स्वभाव हा धर्मवादी आहे. त्यांना राजकारणापेक्षा धर्म प्रिय आहे. त्यामुळे धर्माच्या नावाने केलेले आवाहन भारतीयांना लवकर पटते यासाठी गांधीनी धर्माचा वापर केला. गांधीच्या नेतृत्वाचा बारकाईने अभ्यास केल्यास त्यांची त्या मागील भूमिका स्पष्ट होते. गांधी धर्म व राजकारण याविषयी मत व्यक्त करतांना म्हणाले होते की, ‘‘सत्याची सार्वभौम अथवा सर्वव्यापी भावनेचे साक्षात दर्षन मिळविण्यासाठी मनुष्याला शुद्र प्राण्याच्या प्रति पण आपल्या सारखे प्रेम करणे आले पाहिजे आणि यामध्ये जो व्यक्ती यशस्वी होण्याचा प्रयत्न करतो तो स्वतःला जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रापासून बाहेर पाहु शकत नाही.

हेच कारण आहे की सत्याप्रती माझ्या भक्तीने मला राजकारणामध्ये उभे केले आहे. यावरुन मी कोणताही संकोच न करता अत्यंत विनम्रपणे हे सांगु इच्छितो की लोक असे म्हणतात की धर्माचा राजकारणांशी काही संबंध नाही याचा अर्थ त्यांना धर्माचा खरा अर्थ माहित नाही."[8] गांधीच्या मते धर्मविहीन राजकारण म्हणजे घाण आहे कारण ते आपल्याला मारुन टाकते.[9]

गांधीना धर्मामध्ये असणारी नैतिकता राजकारणामध्ये आणावयाची होती. त्यासाठी ते लोकांना धार्मिक भाषेत समजावून सांगायचे. कारण भारतीयांना धर्माची भाषा समजते. भारतीयांना आधुनिक राजकीय विचारप्रणाली परिचित नसल्यामुळे ते राजकारणापासून दूर गेले होते. गांधीनी त्यांना राजकारणाकडे आकृष्ट करण्यासाठी धार्मिक आवाहन केले. हिंदूना एकत्र करण्यासाठी त्यांनी रामराज्याची कल्पना वापरली. रामराज्याविषयी हिंदूंना नव्याने सांगण्याची गरज नव्हती. रामराज्य संकल्पनेच्या माध्यमातून लोक गांधीकडे आशेने पाहु लागले. मुस्लिमांना एकत्र करण्यासाठी गांधीनी खिलाफत चळवळीचा उपयोग केला. गांधीच्या प्रभावामुळे हिंदु-मुस्लिम एकमेकांच्या धर्माचा आदर करायला लागले. गांधीना आणि हिंदूंना वाईट वाटू नये म्हणून खिलाफत चळवळीच्या दरम्यान ईदच्या दिवशी कोणत्याही मुस्लिमांनी गाय मारली नाही व मांस खाल्ले नाही.[10] रौलट कायद्याविरुध्द गांधीच्या नेतृत्वाखाली झालेल्या चळवळीची सुरुवात एक दिवसाच्या सार्वत्रिक उपवासने व समुद्र स्नानाने झाली. मुस्लिमांना त्यात भाग घेणे शक्य व्हावे म्हणून त्यांच्या धार्मिक निर्बंध लक्षात घेऊन हा उपवास चोविस तासाहून अधिक मुदतीचा असणार नाही असे गांधीनी जाहीर केले होते.[11] धार्मिक हिंदूंना व मुस्लिमांना राष्ट्रीय चळवळीत आणण्यासाठी ज्या पध्दतीने गांधीनी धर्म वापरला. त्याच पध्दतीने भारतीय मध्यमवर्गाला चळवळीत सक्रीय करण्यासाठी असहकाराचा कार्यक्रम मध्यम वर्गापूरता मर्यादित करण्यात आला होता. मग या चळवळीत सर्वसामान्यांना सामावून घेण्यासाठी त्यांना झेपेल असा साधासोपा कार्यक्रम त्यापुढे गांधीनी कार्यक्रम त्यापुढे गांधीनी ठेवला. त्यामध्ये उपवास, सामुदायिक प्रार्थना, हरताळ, प्रभातफेऱ्या, परदेशी कपड्यांच्या होळ्या, दारु दुकानावरील निरोधने.[12] गांधीना हे माहित होते की कोट्यावधी शेतकऱ्यांची सहानुभूती संपादन केल्याशिवाय राष्ट्रीय चळवळ व्यापक पायावर उभी राहु शकणार नाही. त्यामुळे चरख्याच्या निमित्ताने शेतकऱ्यांच्या प्रश्नांना काँग्रेसच्या कार्यक्रमात त्यांनी महत्वाचे स्थान मिळवून दिले.[13] शहर व खेडी यांना जोडणारादुवा म्हणून गांधींनी चरख्याचे महत्व वाटत होते. राष्ट्रीय चळवळ खेड्यांपर्यंत पोहचविण्याचे श्रेय चरख्याला जाते. गांधीच्या नेतृत्व गुणाचा हा विजय होता की त्यांनी आपली चळवळ कोणत्याही एका गटाकडे जाणार नाही, ती चळवळ सर्वांना सामावून होईल, ती सर्वांना आपली वाटेल याची काळजी घेतली. त्यासाठी त्यांनी त्या चळवळीचा कार्यक्रम निष्चित करताना प्रत्येक वर्गाला त्यामध्ये भाग घेता येईल यासाठी त्यांच्याषी निगडीत असलेल्या साधनांना त्यात समाविष्ट केले.

गांधीच्या अगोदर साम्राज्य विरोधी चळवळ बव्हंशी उच्चर्णीय बुध्दीजीवी मध्यम वर्गीयापुरती मर्यादित होती. शेतकरी, कामगार, ब्राम्हणेत्तर आणि दलित असे अनेक गट काँग्रेस पासून व साम्राज्यविरोधी चळवळीपासून दूर राहिले होते.[14] गांधी या सर्वांना सामावून घेण्याची चळवळ सुरु केली. चंपारण खेडा आणि अहमदाबाद येथील घडामोडीनंतर बलिष्ठाकडून समाजातील कोणत्याही दुर्बल गटावर अन्याय झाल्यास त्याचे निवारण करण्यासाठी नेटाने उभा राहणारा एक युयुत्सु वृत्तीचा पुढारी अशी गांधीची प्रतिमा जनमानसात निर्माण झाली. आणि सामाजिक व राजकीय बाबतीत त्यांच्या नेतृत्वाकडे लोक आशेने पाहु लागले.[१५]

गांधींनी काँग्रेसच्या नेतृत्व स्वीकारल्यानंतर काँग्रेसमध्ये आमुलाग्र परिवर्तन घडवून आणले. गांधीपूर्व काँग्रेस ही मुठभर लोकांची संघटना होती. त्या संघटनेला गांधींनी एक चेहरा देऊन लोकांची संघटना बनविण्याचा प्रयत्न केला. काँग्रेसमध्ये उच्च राहणी, उच्च विचारसरणी हा विचार होता. गांधींनी यामध्ये बदल करुन साधी राहणी, उच्च विचारसरणी हा विचार रुजविला. काँग्रेसमधील गांधीपूर्व नेते स्वतःच्या राहणीमानाकडे जास्त लक्ष देत होते. दक्षिण आफ्रिकेत काम करतांना गांधी 1901 च्या काँग्रेसच्या अधिवेशनाला उपस्थित होते. तेथे गांधी बसलेले असतांना काँग्रेसच्या सर्व लोकांचे लक्ष गांधींच्या शर्टाकडे होते. कारण त्यांच्या शर्टाचे एक बटन उघडे होते. संपूर्ण अधिवेशनामध्ये त्याच बटनाची चर्चा होती.[16] रानडे कलकत्याच्या अधिवेशनाला गेले तेव्हा स्वतः बरोबर ३२ नोकर घेऊन गेले होते.[17] गांधींनी या गोष्टी बंद करुन हे स्पश्ट केले की राजकीय नेतृत्वाने अशा पध्दतीने वागल्यास लोक नेत्यांपासून दूर जातात.

ब्रिटिशांसारख्या बलाढ्य शासनकर्त्यांषी सामना करावयाचा असेल तर केवळ वर्षातून एखाद अधिवेशन घेऊन भागणार नाही. त्यासाठी काँग्रेस ही जनतेची एक शिस्तबध्द अशी क्रियाशील संघटना बनविले पाहिजे. राष्ट्रीय काँग्रेस लोकांपर्यत पोहचवण्यासाठी लोक भाषेचा वापर केला जाऊ लागला. म्हणुन काँग्रेस समित्यांची भाषावार फेररचना करण्यात आली. हिंदीला राष्ट्रीय एकात्मतेची साधन म्हणुन सार्वजनिक कार्यक्रमात अग्रस्थान देण्यात आले.

गांधीनी स्वराज्याचा अर्थ इंग्रजांच्या साहाय्याशिवाय आपले स्वतंत्र अस्तित्व टिकविण्याची आपली क्षमता होय.[१८] हे लोकांना पटवून दिले. इंग्रजांना विरोध करतांना भारतीय जनतेने स्वावलंबनाची, सहकार्याची आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना निर्माण करण्याची खटपट केली. सरकारी शाळा ओस पडल्या तर त्याच्या जागी राष्ट्रीय शाळा स्थापन केल्या. वकिलांना आपले व्यवसाय सोडले तर न्यायदानासाठी बिन सरकारी स्वतंत्र संघटना अस्तित्वात आणून लोकांमधील तंटे कमी खर्चाने व बिनाविलंब सोडविण्यासाठी संस्था स्थापन केल्या.

गांधीच्या नेतृत्वाचे आणखी एक महत्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे त्यांनी आर्थिक दृष्ट्या भारतीयांना चरख्याच्या माध्यमातून सक्षम करण्याचा प्रयत्न केला. गांधीनी आपले स्वतःचे आर्थिक व्यवहार फार पारदर्शक ठेवले व भारतीयांना ही त्यांनी हीच सवय लावण्याचा प्रयत्न केला. त्यांनी 1916 मध्ये विश्वस्तांची कल्पना मांडली होती. विश्वस्त कल्पनेचा उदय प्युरिटन धर्ममतामध्ये आहे. जगातील यच्चयावत वस्तुवर अखेर परमेश्वनाचीच सत्ता आहे. माणसाला त्याने फक्त उपजीविकेचाच अधिकार दिलेला आहे. स्वतःच्या व्यवसायात माणसाला जे यश मिळते ते परमेश्वराची त्याच्यांवरील कृपेचे लक्षण आहे. या संपत्तीचा वापर स्वतःच्या सुखोपभोगासाठी करणे हे पाप आहे. अपरिग्रही वृत्तीने संपत्तीतील पै न पैचा हिशोब परमेश्वराला चुकता करण्यासाठी प्रत्येकाने तयार झाले पाहिजे. ही कल्पना प्युरिकेन धर्म विचारामध्ये आढळून येतो. पण प्युरियन धर्मविचाराचा भर निवृत्तीवर असून या निवृत्तीप्रवन राहणीचा स्वाभाविक परिणाम आर्थिक क्षेत्रात बचत व भांडवल इतकाच होतो. गांधीनी परमेश्वराच्या जागी दरिद्र्य नारायणाची स्थापन केली. श्रीमतांनी आपली संपत्ती समाजाच्या मालकीची आहे असे समजावे. आपण फक्त तिचे विश्वस्त आहोत ही भावना मनात रुजवावी. आपल्या किमान गरजा भागविण्यापुरते उत्पन्न स्वतःसाठी खर्च करावे आणि उरलेली सर्व संपत्तीचा विनियोग समाजाच्या कल्याणासाठी करावा अशी गांधींनी या कल्पनेला आपली पुष्टी जोडली होती.[19] बनारस हिंदू विद्यापीठाच्या उद्घाटन प्रसंगी 1916 सालच्या फेब्रुवारी महिन्यात गांधींनी जे भाषण केले त्यात त्यांनी विश्वस्त वृत्तीचा प्रथम उल्लेख केला होता. संस्थानिकांनी आपणास प्रजेच्या संपत्तीचे विश्वस्त मानुन त्यांच्या कल्याणासाठी राज्याच्या उत्पन्नाचा विनियोग करावा असा सल्ला त्यांनी आपल्या भाशणात दिला.[20]

गांधी नेतृत्वाने भारतातील सर्वसामान्याच्या श्रम प्रतिष्ठा मिळवून दिली. गांधीनी आपल्या क्रांतीची शस्त्रे म्हणुन चरखा आणि केरसुनीला मान दिला होता.[21] गांधीच्या आश्रमामध्ये तत्कालीन कालखंडाचे मोठ-मोठे नेते सर्वसामान्य काम करतांना दिसत होते.[22]

गांधीच्याच नेतृत्वाचा हा एक महत्वाचा भाग होता की त्यांनी भारतीयांच्या मनामध्ये असलेली तुरुंगाची व पोलिसांची भीती नाहिषी केली. गांधीनी महिलांचे महत्व लक्षात घेऊन महिलांना राजकारणांमध्ये सक्रीय केले. न्यायमुर्ती रानडे एकदा म्हणाले होते की आपण अनेक वर्षामध्ये महिलांच्या स्वातंत्र्यासाठी जे करु शकलो नाही ते गांधी एका दिवसात करतात.[23] एकदा मृदुला साराभाई गांधीकडे जाऊन म्हणाल्या की आता आम्ही महिलांनी काय करावे. त्यावेळी गांधी म्हणाले की "मी भारतीय महिलांना स्वयंपाक घराच्या बाहेर काढले आहे आता ही तुमची जबाबदारी आहे की त्या पुन्हा तेथे जाणार नाही."[24]

गांधीच्या या असामान्य नेतृत्व गुणांमुळे जे परिवर्तन झाले त्यामुळे काही लोकांना हे पसंत नव्हते. त्यांनी आपल्या वेगळ्या भूमिका स्वतंत्र व्यासपीठावरुन मांडण्यास सुरुवात केली. कॉंग्रेसमध्ये राहून ती आपल्या विचाराने चालविता येणार नाही म्हणुन हिंदू महासभा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, कम्युनिस्ट पक्ष, समाजवादी पक्ष यांनी स्वतंत्र संघटना बांधल्या. या सर्व संघटना गांधी भारतीय राजकारणात सक्रीय झाल्यानंतर उदयाला आल्या.

**समारोप:**

गांधीनी आपल्या असामान्य नेतृत्व गुणाच्या बळावर भारतीयांना वेगळे आत्मभान दिले. नव्या जाणीवा दिल्या. पुन्हा भारतीय प्रतिकांकडे लोकांना पाहण्यास शिकविले. भारतीय स्वातंत्र्य चळवळीची साधने निवडतांना ती पूर्णपणे भारतीय असावीत ती परदेशी नसावीत याची काळजी घेतली. आता पर्यंत राजकारणाची ज्या लोकांचा संबंध नव्हता त्या लोकांना गांधीनी राजकारणात आणले. जी स्वातंत्र्य चळवळ कधी काळी एका विशिष्ट वर्गाची मानली जायची त्यामध्ये गांधींनी समाजाच्या सर्व घटकांना समावून घेण्याच्या प्रयत्न केला. गांधीनी ब्रिटिश सत्तेच्या विरोधात लढा देतांना सर्व सामान्याच्या पोटाची खळगी भरण्याची व्यवस्था केली. त्यांचे आर्थिक प्रश्न सोडवले. यामाध्यमातून त्यांनी भारतीयांना आर्थिकदृश्ट्या सक्षम तर केलेच पण या माध्यमातून ब्रिटिष सत्तेचा भारतातील आर्थिक पाया डळवळीत केला? गांधीनी लोकांना चळवळीमध्ये सामील होण्याचे नवीन माध्यम उपलब्ध करून दिले. चळवळीत सामील व्हायचे असेल तर रस्त्यावर उतरण्याची गरज नाही. तम्ही त्यांच्या घरी सूत कातून ब्रिटिषांना विरोध करू षकता. दारूच्या दुकानाच्या बाहेर निरोधणे करत बसू षकता, खादी घालुन विरोध करू षकता.

आधुनिक युगामध्ये दुसÚयावर प्रयोग करुन दाखवणाÚयामध्ये स्वतःचा समावेश न करता स्वतःवर प्रयोग करुन लोकांना त्यांनी ते दाखवले. उच्चवर्णीयांच्या हातून स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व गांधीनी काढून ते सर्वसामान्याच्या हाती दिले. काही माणसं आयुष्यातील एक काम आयुष्यभर करतात. पण गांधीनी एका आयुष्यामध्ये असंख्य काम केले. यातून त्यांच्या नेतृत्व क्षमता लक्षात येतात.

## संदर्भग्रंथसूची:-

**टीपा:**

1. बिपनचंद्र व इतर, भारतीय स्वातंत्र्य संघर्श, दिल्ली, 1990, पृ. 128-129
2. न. र. फाटक, लोकमान्य, मुंबई, तिसरी आवृत्ती 2006, पृ. 155-157
3. पास्कल ॲलन नाझरेथ (अनुवाद), सुजाता गोडबोले, गांधीजींचे असामान्य नेतृत्व, मे 2014,

पृ.1
4. उपरोक्त
5. उपरोक्त
6. नलिनी पंडित, गांधी, मुंबई 1983, पृ. 88
7. या संबंधीचे विवेचन हे कार्ल मार्क्स, जेम्स मिल, साजॉन सिले यांनी केले आहे.
8. एम. के. गांधी, मा......या सत्याचे प्रयोग, अहमदाबाद (13 वी आवृत्ती) 2005, पृ. 370-371
9. उपरोक्त
10. राजमोहन गांधी, (अनुवाद) मुक्ता षिरीश देषपांडे, मोहनदास, पूणे, 2013 पृ. 307
11. डी. जी. तेंडूलकर, महात्मा खंड 1, दिल्ली 1951 पृ. 297
12. टीप 6, पृ. 94
13. उपरोक्त, पृ. 96
14. उपरोक्त, पृ. 89
15. उपरोक्त
16. वा. ना. कुबेर, भारताचा स्वातंत्र्य लढा: 1930-34, मुंबई, 2002, पृ. 35
17. उपरोक्त
18. टीप 6, पृ. 96
19. टीप 11, पृ. 223
20. उपरोक्त
21. चंद्रशेखर धर्माधिकारी, शोध गांधीचा, मुंबई 2006, पृ. 36
22. गांधीच्या अहमदाबादच्या भाषणामध्ये तत्कालीन कालखंडाचे मोठ मोठे नेते, उद्योगपती सर्वसामान्यांची कामे करताना दिसून येत होते. नेहरू भाजी कापतांना, जमनालाल बजाज धान्य दळतानाचे दृश्य अनेकांनी पाहिले होते. यामाध्यमातून गांधीनी श्रमाला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचे काम केले होते.
23. सुजाता (संपादन), बापू और स्त्री, वाराणसी 2012 पृ. 7
24. बिपनचंद्रा, द लेगसी ऑफ फ्रीडम मुव्हमेंट, दिल्ली 2000, पृ. 5